जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - १३३ दिनांक - २३/०२/२०२४**

गुन्हे शाखा, युनिट-४, पुणे शहर.

## गर्दीचा फायदा घेवून महिलांचे दागिने चोरणारे सराईत केले जेरबंद

खडकी पोलीस ठाणे गु.र.नं. १९/२०२४ भा.द.वि. कलम ३७९, ४१३, २०१, ४१४, ३४ या दाखल गुन्हयाचे अनुषंगाने युनिट -०४ कडील पथक खडकी पोलीस ठाणेच्या हद्दी मध्ये गुन्हे प्रतिबंधक पेट्रोलिंग करत असताना **पोलीस हवालदार अजय गायकवाड व पोलीस हवालदार सारस साळवी** यांना मिळालेल्या गोपनिय माहीती वरुन इसम नामे **संतोष ऊर्फ संत्या ऊर्फ मॅनेजर शरणप्पा जाधव वय ३९ वर्षे, रा. वरद हॉस्पिटल समोर, घुले नगर मांजरी बुद्रुक, पुणे** यांस ताब्यात घेतले. त्याचे कडे दाखल गुन्हयाचा तपास करत असताना त्याचे जवळ एक धातुकट करण्याचे कटर (कात्री) मिळून आली. तसेच त्याचे कडे त्याचे इतर साथीदारां बाबत तपास करता त्याने त्याचा **सुधिर नागनाथ जाधव रा. साऊथ इंडीयन हायस्कुल जवळ, शास्त्री नगर, अंबरनाथ वेस्ट, जि. ठाणे** या सोबत पुणे व परिसरा मध्ये वेगवेगळया ठिकाणी गर्दीचा फायदा घेवून बस मध्ये सोन्याचे दागिने तसेच पर्स चोरल्याचे व चोरलेले सोन्याचे दागिने हे काही दागिन्यांच्या वळया बनवून सं्तोष याने स्वतःकडे ठेवून उर्वरित दागिने सुधिर कडे देवून ते अंबरनाथ येथिल मयुरा ज्वेलर्सचे मालक **सोनार कुशलसिंह जोधसिंह राव वय- ३८ वर्षे रा. कृष्णकुंज अपार्टमेन्ट, कोहजगाव, अंबरनाथ पश्चिम, ठाणे** यांना विकल्याचे सांगितलेने अंबरनाथ येथुन सुधिर नागनाथ जाधव रा. साऊथ इंडीयन हायस्कुल जवळ, शास्त्रीनगर, अंबरनाथ वेस्ट, जि. ठाणे व कुशलसिंह जोधसिंह राव वय- ३८ वर्षे रा. कृष्णकुंज अपार्टमेन्ट, कोहजगाव, अंबरनाथ पश्चिम, ठाणे यांना ताब्यात घेतले. **आरोपींता कडून पुणे शहरातील विविध पोलिस स्टेशन कडील, सोलापुर रेल्वे पोलीस स्टेशन व आळेफाटा पोलीस स्टेशन पुणे ग्रामीण कडील चोरीचे गुन्हे उघडकीस आलेले आहेत.**

सदरची उल्लेखनिय कामगिरी मा. पोलीस आयुक्त श्री.अमितेशकुमार, मा. पोलीस सह आयुक्त श्री.प्रविण पवार, मा.अपर पोलीस आयुक्त गुन्हे, श्री शैलेद्र बलकवडे, मा. पोलीस उप आयुक्त गुन्हे श्री. अमोल झेंडे, मा. सहा. पोलीस आयुक्त गुन्हे-२ श्री. सतिश गोवेकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सोमनाथ जाधव यांचे मार्गदर्शनाखाली युनिट ४ कडील सहा. पोलीस निरीक्षक श्री.विकास जाधव, पोलीस उप निरीक्षक श्री. जयदीप पाटील, पोलीस अंमलदार अजय गायकवाड, विठ्ठल वाव्हळ, हरिष मोरे, प्रविण भालचिम, सारस साळवी, संजय आढारी, अशोक शेलार, भरत गुंडवाड, अमोल वाडकर,वैशाली माकडी,शितल शिंदे यांनी केली आहे.